ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 58.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १० ऑगस्ट, १९५५ | अंक ३२

## विविध माहिती

**जामनगरला पाण्याचा पुरवठा**—जामनगर ह्या शहराला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी व ड्रेनेजची बांधणी करण्यासाठी म्युनिसिपालिटीनें योजना तयार केली आहे. ह्या कामासाठी सौराष्ट्र सरकारनें म्युनिसिपालिटीला २४ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. पाणीपुरवठ्यासाठी १५ लाख रुपये खर्च होतील व ड्रेनेजसाठी ९ लाख रुपये खर्च होतील.

**तिबेट व भारत ह्यांचा व्यापार**—भारतामधून जरूर तो माल विकत घेण्यासाठी चिनी अधिकाऱ्यांनीं तिबेटमधील व्यापाऱ्यांना ५० लाख रुपयांचे चेक दिले आहेत. हे चेक कलकत्ता येथील बँक ऑफ चायनावर काढलेले आहेत. ह्या रकमेचा उपयोग करून तिबेटमधील व्यापारी भारताकडून अन्न, औषधें, कापड, इत्यादि जरूरीचे जिन्नस विकत घेतील.

**शिक्षणावरील खर्चांत कपात**—भारतीय सरकारच्या शिक्षण-खात्यानें सर्व राज्यांतील शिक्षणासाठी म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १००० कोटी रुपयांची मागणी केली होती. पण नियोजन समितीनें ५०० कोटी रुपयेच मंजूर केले. राज्यांच्या शिक्षणविषयक योजनांची आतां पुनर्घटना करावी लागणार आहे.

**पाकिस्तानचें राष्ट्रीय उत्पन्न**—१९५३-५४ सालच्या पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नांत त्या पूर्वीच्या वर्षाच्या उत्पन्नाच्या मानानें ७ टक्के वाढ झाली आहे; दरडोई २४५ रुपये उत्पन्न होतें. एकूण उत्पन्नापैकीं ६० टक्के वाटा शेतीचा होता.

**परदेशाकडून पोलादाची आयात**—भारताला आपली पोलादाची गरज भागविण्यासाठी परदेशाकडून पोलादाची आयात करावी लागते. अमेरिका, जपान, ब्रिटन, रशिया, इत्यादि देशांकडून पोलाद आयात करण्याची तयारी भारतानें दाखविली आहे. झेकोस्लोव्हाकिआकडून प्रथमच ८,००० टन पोलाद भारत घेणार आहे.

**मद्रास राज्यांत साखरेचे कारखाने**—मद्रास राज्यांत साखरेचे दोन कारखाने काढण्याचा विचार एका ब्रिटिश कंपनीनें चालविला आहे. प्रत्येक साखर कारखान्यांत रोज ८०० टन ऊंस गाळण्याला योग्य अशी यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे.

**कारेगांव येथील साखरेचा कारखाना**— श्रीरामपूर तालुक्यांतील कारेगांव येथें सहकारी तत्त्वावर चालणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी जमविण्यास जरूर असणारें किमान ८ लाख रुपयांचें भांडवल जमा झालें आहे. भागीदारांची संख्या १,००० आहे. कारखान्यानें १२५ एकर जमीन उसाच्या लागवडीसाठी विकत घेतली आहे. प्रत्यक्ष उत्पादनास पुढील वर्षी प्रारंभ होईल.

**जंगली हत्ती पकडण्याचा निर्णय**—आसामच्या सरकारनें निरनिराळ्या जंगलांतील ४०८ जंगली हत्ती पकडण्याचें ठरविलें आहे. शिकारीचा हंगाम सुरू झाला म्हणजे त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यांत येईल. त्याशिवाय ईशान्य सरहद्दीवरील अधिकाऱ्यांनींहि ११६ जंगली हत्ती पकडण्याचें ठरविलें आहे.

**गंगेवरील पुलाचें काम**—गंगेवर गुरुमुक्तेश्वर नजीक बांधण्यांत यावयाच्या पुलाचें प्राथमिक काम सुरू झालें आहे. पुलासाठी १·५ कोटी रुपये खर्च होतील, असा अंदाज आहे. ह्याशिवाय पूल लखनौ-मीरत हमरस्त्याला जोडण्यासाठी १४ मैलांचा रस्ताहि बांधण्यांत येणार आहे.

**अमेरिका-रशिया व्यापार**— युद्धासाठी उपयोग न होणाऱ्या मालापैकीं जो माल अमेरिकेकडून आयात करतां येईल तो करण्याचें रशिआचें धोरण आहे. अमेरिकेच्या व्यापारी खात्यानें प्रसिद्ध केलेल्या तिमाही अहवालांत ही गोष्ट नमूद करण्यांत आली आहे. १९५४ च्या पहिल्या तिमाहींत अशा प्रकारचा १२,५३,००० डॉलर्सचा माल रशिआला निर्यात करण्यांत आला होता. १९५५ च्या ह्याच कालांत १६,१५,००० डॉलर्सचा माल निर्यात करण्यांत आला.

**वहातुकीच्या डब्याचा कारखाना**— विशाखापट्टम् येथें रुंद रुळावर चालणाऱ्या रेल्वेचे, मालाच्या वहातुकीचे डबे तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. परदेशाहून मागविण्यांत आलेल्या भागांची जुळणी करून दरमहिना सुमारें ३० डबे तयार करण्यांत येतील.

**डॉ. भाभा ह्यांचें जिनीव्हाला प्रयाण**—अणुशक्तीच्या शांततामय उपयोगासंबंधीं संयुक्त राष्ट्रसंघातर्फे भरविण्यांत आलेली पहिली परिषद गेल्या ८ तारखेस सुरू झाली. भारतातर्फे डॉ. भाभांच्या नेतृत्वाखालीं प्रतिनिधिमंडळ गेलें आहे.

**राजस्थान सरकारची चौकशी-कमिटी**—राजस्थान सरकार आपल्या आर्थिक परिस्थितीची पहाणी करण्यासाठी एक चौकशी कमिटी नेमणार आहे, असें समजतें. राज्य-सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी, विकास-योजनावर होणारा खर्च, सार्वजनिक कर्ज, कर, आणि सरकारचा कारभारविषयक खर्च कमी करण्याची शक्यता, ह्यासंबंधीं कमिटी चौकशी करील.

**कोल्हापूर जिल्ह्यांत साखरेचे कारखाने**—कोल्हापूर जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारे तीन साखरेचे कारखाने काढण्याची प्राथमिक तयारी पूर्ण झाली आहे. साखरेच्या उत्पादनास प्रत्यक्ष प्रारंभ होण्यास २ वर्षे लागतील. दरम्यान रस्ते, विहिरी, इत्यादि जरूर त्या कामास प्रारंभ करण्यांत आला आहे.

**आंध्र राज्यांत कांच-कारखाना**—आंध्र राज्य-सरकारनें पुरस्कृत केलेला कांचेचा कारखाना नुकताच सुरू झाला. कारखाना नेलोर येथें असून तो काढण्यास १,०१,२०० रुपये भांडवल लागलें. त्याशिवाय कारखान्यासाठी दरवर्षी सुमारें १,९८,८०० रुपये खर्च करावे लागतील.

**सोलर कुकर्सना मागणी**—सूर्याच्या उष्णतेचा उपयोग अन्न शिजविण्यासाठी करणारे कुकर्स भारतीय शास्त्रज्ञांनीं तयार केलेले आहेत. ह्या कुकर्सचा उपयोग कसा काय होतो तें पहाण्यासाठी दक्षिण र्‍होडेशिआच्या सरकारनें भारताकडून चार कुकर्स मागविण्याचें ठरविलें आहे. सध्यां र्‍होडेशिआंतील कांहीं भागांत जळणासाठी लांकडें तोडण्याचा सपाटा चालला आहे.

**मुंबईच्या कंपनीला मदत**—मुंबईच्या नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. ह्या कंपनीला अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें २,७०,००० डॉलर्स कर्ज मंजूर केलें आहे. कर्जाचा विनियोग अमेरिकन कारखान्यांकडून जरूर ती यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठीं करण्यांत यावयाचा आहे. कर्जावर कमींत कमी ५ टक्के व्याज आकारण्यांत येईल.

**रशिआला हत्तींची भेट**—पं. नेहरूंनीं रशिआंतील प्राणिसंग्रहालयांत ठेवण्यासाठी दोन हत्तींची भेट दिली आहे. एक हत्ती नर असून त्याचें वय १५ महिन्यांचें आहे. दुसरी मादी असून तिचें वय ११ महिन्यांचें आहे. हत्तींना सुखरूप पोंचविण्यासाठी पशूंचा डॉक्टर व माहुतहि त्यांच्याबरोबर गेले आहेत.

**जबलपूर येथील खेळांचा आखाडा**—जबलपूर नजीक राणीताल येथें खेळांसाठी एक स्टेडिअम बांधण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी राज्य-सरकारनें ५०,००० रुपये मंजूर केले असून जबलपूर कॉर्पोरेशन आणि मध्यप्रदेश ऑलिंपिक असोसिएशन ह्यांच्याकडून अनुक्रमें ३५,००० रु. व १५,००० रु. खर्चादाखल मिळणार आहेत.

**आसाममध्यें कोरडी गोदी**—आसाम सरकारनें पंडू येथें एक कोरडी गोदी बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या गोदीचा उपयोग वर्कशॉप सारखाहि करतां येईल. तीसाठीं १६१ लाख रुपये खर्च येईल. आसाममधील अंतर्गत वहातूक बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नद्यांतील बोटींनीं होते गोदीमध्यें बोटींची दुरुस्ती करणेची सोय करण्यांत येईल.

**यात्रेकरूंची खास सोय**—येत्या सिंहस्थ यात्रेच्या वेळीं नाशिक ते त्रिंबकेश्वर ह्यांच्या दरम्यान यात्रेकरूंची वहातूक करण्यासाठीं स्टेट ट्रान्सपोर्ट खातें ५० नव्या मोटारींची खास सोय करणार आहे. दर मैलाला ९ पै ऐवजीं १ आणा आकार घेण्यांत येणार आहे. दर पांच मिनिटांत तीन मोटारी तळावरून सुटतील.

**दोन बँकांना परवाने नाकारले**—हैद्राबाद राज्यांतील कमर्शिअल अँड इंडस्ट्रिअल बँक लि. ह्या बँकेला आणि कूमेरसर्ली बँकिंग कॉर्पोरेशन लि. कृष्णनगर, ह्या बँकेला बँकिंगचा व्यवसाय करण्याचा परवाना देण्याचें रिझर्व्ह बँकेनें नाकारलें आहे.


दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १२१ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.
* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारीं मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार—SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १० ऑगस्ट, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतांतील कंपन्यांचा आर्थिक संसार

रिझर्व्ह बँकेनें १९५०, १९५१ व १९५२ ह्या सालांबाबत ७४६ हिंदी जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या आर्थिक परिस्थितीची छाननी केली आहे. त्यांचे ताळेबंद व नफातोटापत्रकें ह्यांतील आकड्यांचा तिला आधार घेण्यांत आलेला आहे. भारतांत नोंद-लेल्या, ५ लक्ष रुपयांपेक्षां अधिक वसूल भागभांडवल असलेल्या कंपन्यांचाच त्यांत समावेश आहे. विदेशी कंपन्या, खाजगी लिमिटेड कंपन्या, बँकिंग, विमा व इनव्हेस्टमेंट कंपन्या, इत्या-दींचा त्यांत विचार केलेला नाहीं. म्हणजे, ह्या पहाणींत मुख्यत्वें-करून कारखानदारी, खाणी, मळे, व्यापार, मॅनेजिंग एजन्सी, इत्यादींत गुंतलेल्या कंपन्यांच्या आर्थिक संसारांचाच आढावा घेतलेला आहे. ह्या ७४६ कंपन्यांचें वसूल भाग भांडवल ४३४ कोटी रुपये असून, एकूण पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या तें दोन तृतियांश भरेल. ह्यावरून, प्रस्तुत पहाणीची व्याप्ति लक्षांत येईल.

### पैशाचा वापर

७४६ कंपन्यांची मिळून जिंदगी, १९५२ मध्यें, १२७२ कोटी रु. होती. त्यापैकी यंत्रसामुग्रींत ३६६ कोटी रु., जमीन व इमारतींत १८३ कोटी रु. गुंतलेले होते. देणें बाजूपैकी ३४४ कोटी रु. ( २७% ) वसूल भांडवलाचे व १९४ कोटी रु. ( १५% ) रिझर्व्हजचे होते. कर्जाऊ रकमेचा आकडा २४६ कोटी रु. ( १९% ) होता. घसारा व कराची तरतूद ह्यांच्या रकमा ३०१ कोटी रु. व ६६ कोटी रु. अशा होत्या.

### नवी भांडवल उभारणी

१९५१ व १९५२ मध्यें नवी भांडवल उभारणी खालीलप्रमाणें झाली: —

| | कोटी रुपये | |
|---|---|---|
| | १९५१ | १९५२ |
| ऑर्डिनरी भाग | ४·३४ | २·१४ |
| प्रेफरन्स भाग | १·३६ | ०·९७ |
| डिबेंचर्स | २·५८ | १·९३ |
| नवी उभारणी | ८·२८ | ५·०४ |
| बोनसच्या स्वरूपांत | ४·०८ | २·०३ |
| एकूण भांडवल उभारणी | १२·३६ | ७·०७ |

१९५१ व १९५२ ह्या दोन वर्षांत मिळून १९·४ कोटी रुपयांची भांडवल उभारणी झाली, त्यापैकी नवी उभारणी १३·३ कोटींची होती व ६·१ कोटींची उभारणी बोनसच्या स्वरूपांत होती. नव्या उभारणीपैकी सुमारें निम्मी ऑर्डिनरी भागांचें स्वरूपांत व एकतृतीयांश डिबेंचर्सच्या स्वरूपांत झाली. १९५२ चे मानानें १९५१ मध्यें नवी शेअरविक्री कमी झाली. सिमेंट, केमिकल, कोळसा, वीज, शिपिंग, व्यापार, इत्यादि धंद्यांत ऑर्डिनरी शेअर्सचें प्राधान्य होतें, तर ताग व कागद ह्या धंद्यांत डिबेंचर्सचें होतें. कपास, सिल्क, चहा, इत्यादींत डिबेंचर्सचें प्राधान्य दिसून आलें. डिबेंचर्स व प्रेफरन्स शेअर्स ह्यांवरील व्याजाचे दर पहातां, त्यांची सरासरी १९५१ मध्यें ५·३% व १९५२ मध्यें ५·१% पडली.

### नफा व त्याची वांटणी

कंपन्यांच्या उत्पन्नाचे आकडे पाहिले, तर विक्रीपासून मिळा-लेलें उत्पन्न ८२१ कोटी रु. वरून १९५१ मध्यें १०७४ कोटी रुपयांवर गेलें व १९५२ मध्यें तें १०३७ कोटी रु. झालें. १९५० मध्यें उत्पादनखर्च ५३२ कोटी रु. होता, तो १९५१ मध्यें ७४६ कोटी रु. व १९५२ मध्यें ६९८ कोटी रु. झाला. नोकरांचा पगार व कामगारांची मजुरी ह्यावरील खर्चांत वाढ होत गेली व दिलेल्या व्याजाची रक्कमहि वाढली; म्हणजे कर्ज घेणें अधिक महाग होत गेलें.

१९५०–५१ ह्या तीन वर्षांत मॅनेजिंग एजंटांना ३२ कोटी रुपये, म्हणजे एकूण नफ्याच्या १४% एवढें वेतन मिळालें. १९५० मध्यें तें प्रमाण १३·५%, १९५१ मध्यें १२·८% व १९५२ मध्यें १६% होतें. वांटलेल्या नफ्याशीं मॅनेजिंग एजंटांच्या वेतनाचें प्रमाण ४४% एवढें मोठें पडतें. कपास, ताग, सिल्क, केमिकल, इत्यादि धंद्यांत मॅनेजिंग एजंटांची कमाई जास्त ( नफ्याच्या २०% ) आहे; लोखंड, पोलाद व सिमेंट ह्या धंद्यांत ती कमी ( १०% ) आहे.

### नफ्यांतील मॅनेजिंग एजंटांचा वांटा

| | कोटी रुपये | | | |
|---|---|---|---|---|
| | १९५० | १९५१ | १९५२ | एकूण |
| मॅ. एजंटांचें वेतन | ९·७९ | १२·३३ | १०·२९ | ३२·४१ |
| कर | २४·८६ | ३३·१९ | २४·३० | ८२·३५ |
| वांटलेला नफा | ३३·५८ | २६·६६ | २३·८२ | ७४·०६ |
| न वांटलेला नफा | १४·४४ | २४·३४ | ६·१० | ४४·८८ |
| एकूण | ७२·६७ | ९६·५२ | ६४·५१ | २३३·७० |

१९५२ मध्यें एकूण नफा कमी झाला व न वांटलेल्या नफ्याची रक्कम फारच थोडी राखण्यांत आली, तरी मॅनेजिंग एजंटांना १९५० पेक्षाहि अधिक रक्कम मिळाली, हें वरील आक-ड्यांवरून स्पष्ट होईल.

### नफ्याचा विनियोग

नफ्याचा विनियोग कसा करण्यांत आला, हें खालील तक्त्यावरून लक्षांत येईल. १९५०–५२ ह्या तीन वर्षांतील एकूण नफा ( कराची तरतूद करण्यापूर्वी ) २०१ कोटी रु. भरला; त्यांतून ८२ कोटी रुपयांची ( ४१% ) कराची तरतूद करण्यांत आली व ७४ कोटी रुपये ( ३७% ) डिव्हिडंडच्या रूपानें वांट-ण्यांत आले. ४५ कोटी रुपये (२२%) हिशेबांतच ठेवण्यांत आले. नफ्याशीं डिव्हिडंडच्या रकमेचें प्रमाण सर्वांत अधिक ( ६२% ) ताग, कपास गिरण्या, केमिकल, कोळसा, वीज, चहा, मॅनेजिंग

एजन्सी ह्या धंद्यांत पडलें. लोखंड, पोलाद, कागद, शिपिंग, ह्या धंद्यांनीं कमी प्रमाणांत डिव्हिडंडसाठी रक्कम खर्चून अधिक सावधगिरी दाखविली.

### नफ्यांतून केलेल्या तरतुदी

कोटी रुपये

| | १९५० | १९५१ | १९५२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| करापूर्वीचा नफा | ६२·८८ | ८४·१९ | ५४·२२ | २०१·२९ |
| कराची तरतूद | २४·८६ | ३३·१९ | २४·३० | ८२·३५ |
| करानंतरचा नफा | ३८·०२ | ५१·०० | २९·९२ | ११८·९४ |
| वांटलेला नफा | २४·५८ | २६·६६ | २३·८२ | ७४·०६ |
| न वांटलेला नफा | १४·४४ | २४·३४ | ६·१० | ४४·८८ |

उद्योगधंद्यांचा नफा हें आर्थिक परिस्थितीचें निदर्शक ठरतें व १९५०–५२ मधील नफ्यांत झालेली वाढ व घट हा कोरियन युद्धजन्य चलतीचा व त्यानंतरच्या माघारीचा परिणाम आहे. वरील आंकड्यांवरून हें स्पष्ट होईल.

ठोक नफ्याचें एकूण भांडवलाशीं प्रमाण व ठोक नफ्याचें एकूण विक्रीशीं प्रमाण, हीं दोन्हीं प्रमाणें विशेष महत्त्वाचीं आहेत. पहिल्या प्रमाणानें भांडवलावर सुटणारा नफा कळतो, तर दुसऱ्या प्रमाणानें नफ्याचें मापन होतें. पहिलें प्रमाण १९५० मध्यें ९·०% होतें, तें १९५१ मध्यें वाढून १०·७% झालें पण १९५२ मध्यें ७·५% वर उतरलें. दुसरें प्रमाण ९·६% चें ९·७% होऊन ७·१% वर आलें.

### डिव्हिडंडचा दर

डिव्हिडंडचा सरासरी दर १९५१ मध्यें वाढला पण १९५२ मध्यें उतरला. ऑर्डिनरी, प्रेफरन्स व डिफर्ड ह्या सर्व शेअर्सना हाच अनुभव आला. ऑर्डिनरी भागांच्या डिव्हिडंडचा तपशील खाली दिला आहे.

| धंदा | दिलेले डिव्हिडंड (वसूल भागावरील %) | | |
|---|---|---|---|
| | १९५० | १९५१ | १९५२ |
| कपास गिरण्या | ८·२ | ९·१ | ७·२ |
| ताग | ११·० | १५·२ | ११·२ |
| लोखंड–पोलाद | १२·९ | १४·२ | १६·९ |
| सिमेंट | ७·१ | ८·७ | ९·३ |
| साखर | ८·३ | १०·१ | ९·९ |
| कागद | ९·२ | १२·३ | १०·५ |
| आगपेट्या | १०·८ | १०·८ | १०·४ |
| चहा | १८·७ | १२·१ | ७·१ |
| इतर मळे | ११·२ | १४·५ | १२·२ |
| मॅनेजिंग एजन्सी | १०·० | ९·६ | ८·४ |
| एकूण (इतर धरून) | ७·६ | ८·३ | ७·३ |

### किफायतशीरपणाचें मोजमाप

जाहीर केलेल्या डिव्हिडंडवरून नफ्याची पात्रता मोजणें चुकीचें ठरतें. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केली जाणारी रक्कम व साठलेले रिझर्व्हज ह्यांचा त्यांत हिशेब होत नाहीं. भागदारांना मिळणारें डिव्हिडंड अधिक रिझर्व्हकडे वर्ग केली जाणारी रक्कम ह्यांचें वसूल भांडवल + रिझर्व्हज ह्यांच्याशीं प्रमाण काय पडतें, हीं गोष्ट महत्त्वाची आहे. ह्या दृष्टीनें विचार केला, तर हें प्रमाण १९५० मध्यें ७·७% होतें, तें १९५१ मध्यें ९·७% झालें व १९५२ मध्यें ५·९% वर उतरलें. हा अनुभव प्रमुख व मोठ्या उद्योगधंद्यांच्या बाबतींतहि आला. लोखंड–पोलाद, आगपेट्या, सिमेंट, कागद, इत्यादि बाबतींत तो पुष्कळच वर (१९५२ मध्येंहि १०% पेक्षा अधिक) आढळला.

### पोलादाच्या कारखान्याची पूर्व-तयारी

मध्यप्रदेशांतील भिलई येथें रशिआच्या मदतीनें काढण्यांत येणाऱ्या कारखान्यासाठी योग्य त्या प्रकारची यंत्रसामुग्री मिळविण्याकरितां भारताचें प्रतिनिधिमंडळ रशिआच्या दौऱ्यावर गेलें आहे. भारतीय सरकारच्या उत्पादनखात्याचे सेक्रटरी हे प्रतिनिधिमंडळाचे नेते आहेत. प्रतिनिधिमंडळ ४ आठवडेपर्यंत रशिआंतील निरनिराळ्या पोलाद–कारखान्यांची पहाणी करणार आहे. दौऱ्याहून परत आल्यावर भारतीय सरकारला एक अहवाल सादर करण्यांत येणार आहे. ह्या अहवालाचा विचार करून सरकार अखेरची तपशीलवार योजना तयार करील. रशिआंतील पांच पोलादाच्या कारखान्यांची पहाणी भारताचे प्रतिनिधी करणार आहेत. ह्या पांच कारखान्यांत उरल पर्वतावरील मोठा कारखानाहि आहे. ग्रामीण भागांतील परिस्थिति लक्षांत घेऊन कारखाना कसा काढतां येईल ह्यासंबंधीं अहवालांत शिफारसी करण्यांत येणार आहेत. प्रतिनिधिमंडळापैकी ५ सभासद झेकोस्लोव्हाकिआच्या पोलादाच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी त्या देशांत जाणार आहेत. त्याशिवाय आणखी दोन सभासद जर्मनींत जाऊन तेथील पोलादाच्या कारखान्यांत शिकत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची गांठ घेतील. जर्मनींत सध्यां ८० विद्यार्थी शिकत आहेत. ओरिसामधील रूरकेला ह्या ठिकाणीं काढण्यांत येणारा पोलादाचा कारखाना जर्मन कारखानदारांच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे.

### टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५५ अखेर संपलेल्या वर्षीं ३५ कोटी रुपयांची उत्पादित मालाची विक्री केली. इतर उत्पन्न त्यांत मिळवितां, एकूण उत्पन्न ३६,८१,८९,०३८ रु. झालें. सर्व खर्च वजा जातां, कराची तरतूद करून, ३ कोटी, ३५ लक्ष रु. चा घसारा काढून व १ कोटी रु. प्लँट रीहॅबिलिटेशन रिझर्व्हमध्यें टाकून, कंपनीला २,२२,४७,०७२ रु. नफा उरला. त्यांतून पुन: ३१,९८,९३० रु. जनरल रिझर्व्हकडे व १०,००,००० रु. डेव्हलपमेंट रिझर्व्हकडे वर्ग केले व भागीदारांसाठी डिव्हिडंडप्रीत्यर्थ १,९१,५०,००० रु. राखून ठेवून ५,५२,५४८ रु. पुढील हिशेबांत ओढले. मॅनेजिंग एजंटांना ३२,२८,०३१ रु. कमिशन मिळालें. एवढ्या मोठ्या व्यवहाराची जबाबदारी वहाणाऱ्या १२ डायरेक्टरांना मिळून फीचे २४,९०० रु. मिळाले. कंपनीच्या वार्षिक ऑडिटसाठी १०,००० रु. फी दोन ऑडिटर्सच्या फर्म्सना मिळून देण्यांत आली व जमशेटपूर येथील आणि खाणींवरील हिशेबांच्या त्रैमासिक ऑडिटसाठी ८०,००० रु. देण्यांत आले. ७५ रु. च्या ऑर्डिनरी शेअरला १० रु. ८ आ. डिव्हिडंड मिळणार आहे.

**उत्तर प्रदेशांतील वेधशाळा**—उत्तर प्रदेश सरकारनें नैनीताल येथील वेधशाळेचें बांधकाम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. वेधशाळेच्या इमारतीसाठी राज्य–सरकारला ३ लाख रुपये खर्च येईल. इमारत पुरी झाल्यावर बनारस येथील सध्यांची वेधशाळा तेथें हालविण्यांत येईल.

## सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमाच्या दुरुस्तीची आवश्यकता

( लेखक—एक सहकारी )

मुंबई राज्यांत हल्लीं अमलांत असलेला सहकारी सोसायट्यांचा कायदा सन १९२५ सालीं मंजूर झालेला आहे, व तो त्यावेळेच्या परिस्थितीस अनुसरून तयार करण्यांत आलेला होता. पुढें जरूरी-प्रमाणें व परिस्थित्यनुरूप त्यांत वेळोवेळीं अनेक दुरुस्त्या करण्यांत आलेल्या आहेत. हल्लींचा कायदा हा वेगवेगळया चिंध्यांची बनविलेली एक "गोधडी"च आहे असें म्हटलें, तर तें फारसें वावगें होणार नाहीं.

सन १९२५ सालानंतर अनेक स्थित्यंतरें झालीं. त्यावेळीं सहकारी संस्थांकडून होत असलेलीं वेगवेगळीं कामें व हल्लीं या संस्थांकडून अपेक्षिलेलीं कामें यांत फारच मोठा फरक पडलेला आहे. सोसायट्यांच्या कामकाजांस स्थैर्य यावें म्हणून गेल्या तीस वर्षांत ज्या वेगवेगळ्या योजना व तरतुदी करण्यांत आल्या, त्यांना योग्य तें कायदेशीर स्थान प्राप्त व्हावें म्हणून सहकारी कायद्यांत वेगवेगळीं नवीन कलमें, एवढेंच नव्हे तर प्रकरणेंहि, दाखल करण्यांत आलीं. परंतु अशी नवीन तरतूद करतांना कायद्याच्या पूर्वीच्या आराखड्यांत विशेष फारसा फरक केला गेला, असें दिसत नाहीं.

उदाहरणार्थ, सहकारी संस्थांना त्यांच्या सभासदांना सत्वर व शक्य तितक्या कमी खर्चांत न्याय मिळावा या हेतूनें लवादाची विशेष योजना सन १९२५ सालच्या परिस्थितीस अनुसरून या कायद्यांत करण्यांत आलेली आहे, व ती सदर कायद्याच्या कलम ५४ मध्यें सांगितली आहे. लवादानें दिलेला निकाल वादी अगर प्रतिवादीपक्षांत सामील असलेल्या कोणाहि व्यक्तीस अगर संस्थेस मान्य नसेल तर त्याबाबत सरकारकडे अपील करण्याबाबत तरतूद केलेली होती. परंतु पुढें हें अपील सरकारकडे न करतां त्यासाठी स्वतंत्र न्यायदानमंडळ स्थापन करण्याचें ठरून त्याप्रमाणें या कायद्यांत दुरुस्त्या करण्यांत आल्या. कायद्याचें कलम ५४ मध्यें वादी व प्रतिवादीपक्षांत निर्माण झालेल्या वादाचा निकाल रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेल्या इसमानें करावा अशी योजना आहे. हा निकाल फक्त एका व्यक्तीनें, म्हणजे रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेला इसम यानें केला असल्यास त्यावर अपील करतां येईल अशी तजवीज केलेली आहे. परंतु हा वाद वादी व प्रतिवादी या दोन पक्षांनीं आपापल्यातर्फे एक एक लवाद नेमून दिल्यास या दोन लवादांनीं, रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेल्या इसमाचे मदतीनें, म्हणजे अशा तीन व्यक्तींच्या लवादमंडळानें करावा व मग मात्र विशेष कारणें असल्याशिवाय त्यांच्या निर्णयावर अपील करतां येणार नाहीं. अशी कायद्यांत तजवीज केलेली आहे. परंतु आतां अपिलें ऐकण्यासाठी स्वतंत्र न्यायदानमंडळ प्रस्थापित झालें असल्यानें वर सांगितल्याप्रमाणें निवाड्यासाठी तीन इसमांचें लवादमंडळ नेमण्याची कायद्यांतील तरतूद यापुढें बंद केली तर तें कितीतरी जास्त सोईचें होईल असेंच अलीकडील कित्येक अपिलांत न्यायदानमंडळानें दिलेल्या अनेक निकालांवरून दिसून येत आहे. लवादाची मूळ कायद्यांत जी तरतूद केलेली आहे तिचा मुख्य उद्देश म्हणजे न्याय सत्वर मिळावा असा आहे. दिवाणी कोर्टामार्फत वादाचा निकाल लागण्यास कालावधी होतो असा अनुभव असल्यानेंच लवादाची योजना सहकारी कायद्यांत मुद्दाम केलेली आहे. परंतु कलम ५४ यांत स्वतंत्र न्यायदानमंडळ स्थापन झाल्यानंतर जी दुरुस्ती व्हावयास पाहिजे होती ती न झाल्यानें सहकारी संस्थांना न्याय मिळण्यास आतां इतका कालावधी लागतो कीं यापेक्षा दिवाणी कोर्टाकडूनच अधिक सत्वर न्याय मिळूं शकेल कीं काय असें अनुभवावरून वाटूं लागलें आहे. हल्लींची तजवीज ही दीर्घसूत्रीपणाची असल्यानें सत्वर न्याय मिळाला पाहिजे या मूळ कल्पनेस सुरुंगच लागला आहे असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. म्हणून आम्हीं असें सुचवूं इच्छितों कीं, कलम ५४ यांत योग्य ती दुरुस्ती सरकारनें तावडतोब करावी व वादाचा निकाल रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेला इसम या एकट्यानेंच करावा एवढा भाग ठेवून, तीन इसमांचें लवादमंडळ नेमण्याची हल्लींची असलेली तरतूद काढून टाकावी. एकट्यानें दिलेल्या निकालाविरुद्ध अपील करतां येईल अशी हल्लीं असलेली योजना चालू ठेवली म्हणजे मग कोणाहि पक्षाची अगर पक्षांत सामील असलेल्या व्यक्तीची तक्रार राहण्याचें कारणच उरणार नाहीं. हल्लींच्या योजनेप्रमाणें कितीहि लवकर न्याय देण्याची रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेल्या इसमाची मनापासून इच्छा असली तरी हा न्याय मिळण्यास कालावधी ज्यायोगें अगर पद्धतीनें लावतां येईल अशा अनेक पळवाटा हल्लींच्या कलमांत व कानूंत नमूद आहेत. या पळवाटा बुजल्या अगर बंद केल्याशिवाय न्याय सत्वर व तडकापडकी मिळणें अशक्य आहे, असें आमचे स्वानुभवावरून ठाम मत झालें आहे. कायद्याचें कलम ५४ याची दुरुस्ती करण्याबद्दलचा प्रश्न सरकारपुढें बरेच दिवस लोंबकळत आहे, असें ऐकतों. परंतु या एकाच कलमांतील दुरुस्ती करण्याऐवजीं सर्वच्या सर्व कायद्याचीच आतां पुनर्रचना करावी असा सरकारचा मानस असल्याचें समजतें. सर्व कायदा केव्हां दुरुस्त होईल तो होवो. तूर्त तरी या कलम ५४ ची दुरुस्ती तात्काळ केली गेल्यास हल्लींची निकडीची अडचण दूर होईल असें आम्हांस वाटतें व एवढाच प्रश्न सरकारनें प्रथम हातीं घ्यावा अशी आमची त्यास आग्रहाची सूचना आहे.

---

**तुंगभद्रा नदीवरील धरण**—तुंगभद्रा नदीवरील धरणासंबंधीं प्रसिद्ध करण्यांत आलेल्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं १९५६ च्या मध्याच्या सुमारास हें काम पूर्ण होईल. धरणाच्या कामाला १९४५ सालीं प्रारंभ करण्यांत आला आहे. धरणासाठी सुमारें ५० कोटी रुपये खर्च होतील आणि त्याच्या पाण्यानें २०,००,००० एकर जमीन भिजेल.


सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,३६,०००
रिझर्व रु. ६,४६,०००
ठेवी रु. १,३७,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखाः- दादर, माहीम, बेळगांव, पुणें.
हमाम स्ट्रीट येथें बँकेची फोर्ट शाखा २३ जूनपासून चालू झाली आहे.

## कामगारांना आवाहन व इषारा

दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कंपनी लि. चे चेअरमन, श्री. एस्. चट्टनाथ कारायलर, ह्यांचें वार्षिक सभेंत भाषण.

"भारतांतील ११९ कांच-कारखान्यांपैकीं ४४ कारखाने बंद पडले आहेत. उत्पादनखर्चांत वाढ व उत्पादित मालाच्या विक्रीच्या किंमतींत उतार, हें त्याचें कारण आहे. विक्रीची किंमत कित्येक सर्वसाधारण आर्थिक बाबींवर अवलंबून आहे, तर उत्पादनखर्चावर कांहीं नियंत्रण ठेवतां येणें शक्य आहे. कार्यक्षमता वाढवून व कारखान्याच्या मजुरी देण्याच्या शक्तीप्रमाणें कामगारांच्या मागण्या मर्यादित राखून तें साधूं शकेल. कामगारसंघांच्या पुढाऱ्यांनीं ह्या बाबतींत आपलें वजन उपकारक रीतीनें खर्च केलें पाहिजे. कामगारांच्यामधील कार्यक्षमता कमी झाली म्हणून उत्पादनाचा खर्च वाढला, असें म्हणणें चुकीचें होईल. पुढाऱ्यांच्या नेतृत्वामुळें तें घडतें. कामगारसंघांच्या हक्कांचा उपयोग केवळ असंतोषाकडे व चळवळीकडे करण्यापेक्षा, खऱ्या अडचणी दूर करण्याकडे केला, तर बरें होईल. कारखाना, समाज किंवा देश ह्यांच्या हितसंबंधाकडे कामगारपुढारी दुर्लक्ष करतात. कमी कमी काम करून ज्यास्त ज्यास्त वेतन उपटण्याकडे त्यांचें लक्ष असतें, किंवा त्यांच्या धोरणाच्या परिणामांविषयीं त्यांचें पूर्ण अज्ञान असतें. चुकीच्या नेतृत्वामुळें देशाच्या औद्योगिक संसारांत बिघाड निर्माण होत आहे. कामगारांनीं बाहेरील पुढाऱ्यांच्या हातांत न जातां, स्वतःचे अधिकार स्वतःच वापरले, तर तें त्यांच्या हिताचेंच होईल.

"देशाच्या औद्योगिक विकासाकडे तीन दृष्टिकोनांतून पाहिलें पाहिजे : देशाचें आर्थिक हित, पैसे गुंतविणारांचें हित व कामगारांचें हित. ह्या तीनहि दृष्टिकोनांचा मिलाफ घडवून आणण्यांत आला पाहिजे. परंतु कामगार-संघांची प्रवृत्ति बाकीच्या दृष्टिकोनांकडे दुर्लक्ष करून केवळ स्वतःपुरतेंच पहाण्याची असल्यानें, त्याचे भयंकर दुष्परिणाम घडून येत आहेत. उत्पादन-वाढ झाली नाहीं, तरी कामगारांची प्राप्ती वाढूं शकेल, ही कल्पनाच फोल आहे, इतकेंच नव्हे, तर ती देशविघातक म्हणून गुन्हाच समजण्यांत आली पाहिजे. कामगारांचें कर्तव्य स्पष्ट आहे. त्यांनीं कामांत लक्ष घातलें पाहिजे, कार्यक्षमता वाढविली पाहिजे व स्वतःचा उद्धार देशाच्या उद्धाराशीं निगडित आहे, हें जाणलें पाहिजे. ह्या गोष्टी त्यांच्याच आवाक्यांतील आहेत व त्या दृष्टीनें त्यांनीं कर्तव्य केलें नाहीं, तर त्यांना पस्तावण्याची पाळी आल्याविना रहाणार नाहीं."

---

### प्रश्न कायम, उत्तरांत मात्र बदल

अर्थशास्त्राच्या प्रोफेसराचा एक जुना विद्यार्थी त्यांना भेटावयास गेला, तेव्हां त्यांनीं परीक्षेसाठीं काढलेली अर्थशास्त्राची प्रश्नपत्रिका त्याला दाखविली. प्रश्न वाचून पाहिल्यावर तो विद्यार्थी म्हणाला, "हें काय? मी कॉलेजांत असतांना आम्हांला तुम्हीं हेच प्रश्न घातले होते!"

"होय." प्रोफेसरांनीं उत्तर दिलें, "आम्हीं प्रत्येक वर्षीं तेच तेच प्रश्न विचारतों."

"मागच्या विद्यार्थ्यांकडून नवे विद्यार्थी प्रश्न मागून घेतात, हें तुम्हांला माहीत नाहीं वाटतं?"

"माहीत आहे तर" प्रोफेसरांनीं सांगितलें. "पण, अर्थशास्त्रांत आम्हीं उत्तरें बदलीत असतो."


## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## मार्क्स अँड स्पेन्सर लि.

वरील ब्रिटिश कंपनीस गेल्या वर्षी कराची तरतूद केल्यावर ४४,६८,००० पौंड नफा झाला. भागीदारांना ४५% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. कंपनीची पुष्कळशी मालमत्ता युद्धापूर्वी विकत घेण्यांत आली होती किंवा बांधण्यांत आली होती. तिची आजची किंमत कितीतरी वाढलेली आहे. डायरेक्टरांनीं दोन व्हॅल्यूअर्सच्या फर्म्सची नेमणूक करून त्यांचेकडून मालमत्तेचें मूल्यमापन करविलें. त्यांच्या संयुक्त अहवालानें मालमत्तेची ३१ मार्च, १९५५ रोजींची किंमत ३,५२,९७,१९१ पौंड एवढी ठरविली आहे. तिची पडलेली किंमत १,६०,००,००० पौंड असून पुस्तकांत दाखविलेली किंमत १,२५,६३,३३० रु. आहे. कंपनीचे स्टोअर्सनीं इंग्लंडभर, मुख्य रस्त्यांच्या चौकांतील जागा व्यापलेल्या आहेत. त्यांची बांधणी अद्ययावत् असून, असें रीटेल चेन स्टोर्स आतां निर्माण करणें जवळ जवळ अशक्य आहे. व्हॅल्युअर्सनीं केलेल्या मूल्यमापनांतील मालमत्तेची किंमत १९५४–५५ च्या हिशेबांत घेण्यांत आली आहे. त्यांत निघालेला २,२७,३३,८५८ रुपयांचा वाढावा रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आला आहे. मालमत्तेवर काढण्यांत येणाऱ्या घसाऱ्याचा दर पूर्वी इतका असण्याची जरूरी नाहीं, असें दिसून आलें आहे. मालमत्तेच्या पुनर्मूल्यमापनामुळें डिबेंचर ट्रस्टडीड खाली उभारण्याची कर्जमर्यादा वाढली आहे व धंद्याच्या वाढीसाठी पैसा उभारणें अधिक सोईस्कर झालें आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षी १०,७०,००,००० पौंड किंमतीची विक्री केली. त्यापैकी ९९% माल ब्रिटिश बनावटीचा होता. कंपनीला ब्रिटिश गिरण्यांनीं ९ कोटी वार कापड व ३ कोटी पौंड वजनाचें होजिअरीचें सूत गेल्या वर्षी पुरविलें. कंपनीच्या पटावर ३०,००० नोकर आहेत. त्या सर्वांना कंपनी दररोज जेवण पुरवितें. तें करण्यासाठी व वाढण्यासाठीच १,२०० नोकर आहेत.

---

## पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्यें मृत्यूचें अधिक प्रमाण

ऑल इंडिआ इन्स्टिट्यूट ऑफ हायजिन अँड पब्लिक हेल्थ ह्या संस्थेनें शहरांतील मृत्यूंच्या प्रमाणाविषयीं आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालांतील माहिती १९५२ व १९५३ सालांत गोळा केलेली असून तपासणीसाठी निरनिराळया सामाजिक गटांतील ४,०७५ व्यक्तींची निवड करण्यांत आली होती. कलकत्ता, मुंबई, मद्रास, कानपूर आणि बनारस ह्या चार शहरांची मृत्यूंच्या प्रमाणाविषयीं पहाणी करण्यांत आली. त्यावरून एक गोष्ट अशी दिसून आली कीं, पुरुषांच्या पेक्षा स्त्रियांत मृत्यूचें प्रमाण अधिक आहे. त्यांतहि स्त्रियांच्या ज्या वयांत संतति होण्याचा संभव अधिक असतो त्याच वयाच्या पुरुषांच्या पेक्षा स्त्रियांत मृत्यूचें प्रमाण अधिक असतें. निदान ह्या शहरांपुरतें तरी असें आढळून आलें कीं, क्षय आणि देवी हे रोग स्त्रियांना अधिक प्रमाणांत होतात. ग्रामीण भागांत क्षयाचा प्रसार होण्याचें एक कारण त्यांचा औद्योगिक शहरापासून असणारा नजीकपणा होय. मध्यम वर्गाला इतर वर्गाच्या मानानें ह्या रोगाची बाधा अधिक होते, असें दिसून आलें. कुटुंबनियोजनाबाबत पुरुषांची वृत्ति काय आहे तें आजमावण्याचा प्रयत्न संस्थेनें केला असतां मनोरंजक माहिती उपलब्ध झाली. बहुतेक पुरुषांना होती त्यापेक्षा अधिक मुलें पाहिजे होतीं. कांहीं थोडे हिंदू सोडून बाकीच्यांनीं आपणास आहेत त्यापेक्षा कमी मुलें असतीं तर पाहिजे होतीं असें सांगितलें. मुसलमानांपैकी बहुतेकांनीं त्यांना पांच मुलें असतांनाहि अधिक असावीं अशी इच्छा प्रदर्शित केली.

## खेळाच्या सामानाची निर्यात

भारतामधून दरवर्षी सुमारें १० लाख रुपये किंमतीचें निरनिराळया प्रकारच्या खेळाचें सामान निर्यात करण्यांत येतें. ह्या सामानाची निर्यात अधिक वाढविण्यासाठीं भारतीय सरकार लवकरच एक एक्स्पोर्ट डेव्हलपमेंट कौन्सिल स्थापन करणार आहे. सर्व भारतांत मिळून दरसाल सुमारें १·१५ कोटी रुपयांचें खेळाचें साहित्य तयार होतें. हें सर्व साहित्य देशांतील मागणी भागवूं शकते. गोल्फ खेळण्याच्या काठ्या, उत्तम प्रतीच्या टेनिसच्या रॅकेटस्, क्रिकेटच्या खेळांतील बॅटस् व टेनिसचे चेंडू, येवढ्याच प्रकारचा माल सध्यां परदेशांतून थोड्या प्रमाणांत आयात केला जातो. ह्या उद्योगधंद्यांत ५,००० माणसें रोजगारीवर आहेत. त्यांतील बहुतेक पश्चिम पंजाबमधून आलेले निर्वासित आहेत. निर्वासितांचीं कित्येक कुटुंबें पश्चिम पाकिस्तानमधील सिआलकोट येथून भारतांत आलीं. त्यांची उदरनिर्वाहाची सोय लावण्यांत ह्या धंद्याची चांगली मदत झाली. फाळणीपूर्वी खेळण्याच्या सामानाचें जवळ जवळ सर्व उत्पादन सिआलकोट येथेंच होत असे. फाळणीनंतर ह्या मालाचे कित्येक कारखानदार भारतांत आले आणि पूर्व-पंजाब व उत्तर-प्रदेशांतील ठिकाणीं स्थायिक झाले. पूर्व-पंजाबमधील बटाला व अमृतसर आणि उत्तर प्रदेशांतील मीरत, अलाहाबाद, आग्रा, लखनौ, इत्यादि शहरांतून त्यांनीं आपले धंदे नव्यानें चालू केले आहेत. पाकिस्तानच्या ह्याच प्रकारच्या मालाला ते चांगले तोंड देत आहेत. गेल्या सालीं उत्तर प्रदेशांत ५० लाख रुपयांचा आणि पंजाबांत ३० लाख रुपयांचा माल तयार झाला.

---

## चीनचा पहिला पंचवार्षिक कार्यक्रम

चीनच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत औद्योगिक उत्पादन करणारे कारखाने सर्व देशभर विखुरण्याचें धोरण आंखण्यांत आलें आहे. सध्यां चीनमधील महत्त्वाच्या सर्व उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण समुद्रकिनाऱ्या नजीक असलेल्या भागांत झालेलें आहे. ईशान्य दिशेस असलेल्या मांचुरियापासून वायव्य दिशेस असलेल्या सिकिॲगपर्यंत भारी उद्योगधंद्यांची एक मालिकाच निर्माण करण्याचें योजण्यांत आलें आहे. देशाच्या आंत खोलवर कारखाने काढण्यांत येणार असून त्यांपैकी बरेच रशिअन सरहद्दीजवळ असतील. नव्या औद्योगिक विकासाचा बराच मोठा भाग पीत नदीच्या खोऱ्यांत असणार आहे. ह्या नदीच्या पात्रावर ठिकठिकाणीं ४६ मोठमोठीं धरणें बांधण्यांत येणार आहेत. बोटींची वहातूक, शेतीला पाणी पुरविण्यासाठी कालवे आणि वीजनिर्मितीचीं केंद्रें, इत्यादींसाठी उपयोजना तयार करण्यांत आल्या आहेत. पण हा सर्व कार्यक्रम पार पाडण्यास ५० वर्षांचा कालावधि लागेल. सुमारें २,५०० मैल नवे रेल्वेचे रस्ते बांधण्यांत येणार आहेत. हें सर्व संकल्पित औद्योगीकरण रशिआकडून होणाऱ्या मदतीवर अवलंबून आहे. त्यामुळें चीनचे औद्योगिक हितसंबंध कम्युनिस्ट राष्ट्रगटांशीं अधिक निगडित होत जातील.

---

## पॅरॅमाऊंट उद्योग–व्यापार वार्षिक

पॅरॅमाऊंट उद्योग–व्यापार वार्षिकाचा तृतीय खंड, मुंबई राज्याचे गव्हर्नर डॉ. श्री. हरेकृष्ण मेहताब ह्यांच्या हस्तें ता. २७ जुलै रोजीं प्रकाशित करण्यांत आला. ह्या खंडांत ना. मावळंकर, श्री. न. वि. गाडगीळ, श्री. वि. रा. वेलणकर इत्यादींचे लेख आहेत.

## पर्सनल प्रेस सर्व्हिसचा १८ वा वाढदिवस

पर्सनल प्रेस सर्व्हिसचा १८ वा वर्षदिन व पॅरॅमाऊन्ट उद्योग-व्यापार वार्षिकाच्या तृतीय खंडाचें प्रकाशन मुंबईचे राज्यपाल डॉ. हरेकृष्ण मेहताब यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ जुलै रोजीं पार पडलें. पॅरॅमाऊन्ट पब्लिसिटी सिं० लि. चे चेअरमन श्री. धों. कृ. साठे यांनीं स्वागतपर भाषणांत 'सिंडिकेटतर्फे जाहिरात व प्रसिद्धी क्षेत्रांत गेलीं आठ वर्षें केलेली कामगिरी सांगितली. महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या प्रगतीची, तसेंच या क्षेत्रांतील नवीन शोध व माहिती देणाऱ्या औद्योगिक वृत्तविशेष ही वार्तापत्र देणें, विविध भाषांतून लँगवेज एक्सचेन्ज खात्यातर्फे भाषांतराची सोय व दीपमाला आणि उद्योग–व्यापार वार्षिक इ० प्रकाशनें हीं संस्थेचीं वैशिष्ट्यें असल्याचें ते म्हणाले. श्री. श्री. वि. आगाशे यांनीं समारंभास आलेले सुमारें ५० संदेश वाचून दाखविले.

### श्री. ठाकूर ह्यांचें भाषण

पर्सनल प्रेस सर्व्हिसचे चालक श्री. ना. तु. ठाकूर यांनीं पर्सनल प्रेस सर्व्हिस गेलीं १८ वर्षें सातत्यानें चालविण्यांत किती अडचणींना तोंड द्यावें लागलें, यावर दृष्टिक्षेप करून भारतांत या प्रकारच्या कार्याला अजूनहि पुरेसा पाठिंबा मिळूं नये याबद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित केला. उद्योग–व्यापार वार्षिकाच्या तिसऱ्या खंडांत 'संसारी स्त्रियांसाठी सोयस्कर उद्योग' या स्पर्धेंत भाग घेणाऱ्यांचे त्यांनीं आभार मानले व पुढील व्यक्तींना बक्षिस मिळाल्याचें त्यांनीं जाहीर केलें. पहिलें बक्षिस श्री. अ. आ. थोरे अहमदनगर. दुसरें बक्षिस श्री. ज. म. गोखले पुणें, व सौ. शरयुबाई पुणतांबेकर विहार. तिसरें बक्षिस सौ. पद्मिनी आठवले जेऊरवाडा. चवथें बक्षिस कु. मालती अरकडी चाळीसगांव, सौ. प्रभावती ठाकूर पुणें, कु. पद्मा बेटावद्कर भंडारा, सौ. प्रभा क्षीरसागर पुणें.

### राज्यपालांचें भाषण

यानंतर स्पर्धा निबंधाच्या परीक्षक समितीच्या एक सदस्य सौ. इंदिराबाई नातु, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे कार्याध्यक्ष श्री. दा. वा. पोतदार व प्रा. ना. अ. मावळंकर ह्यांच्या भाषणानंतर समारंभाचे अध्यक्ष राज्यपाल डॉ. मेहताब यांनीं आपल्या अध्यक्षिय भाषणांत लोकशाहीच्या विकासासाठी विविध मतांचा अभ्यास करण्यास पर्सनल प्रेस सर्व्हिससारख्या संस्थेचीं कात्रणें पुरविण्याकरितां आवश्यकता असल्याचें सांगितलें. ही संस्था स्वार्थत्यागपूर्वक अडचणींत चालली असली तरी पुढील काळांत जनतेला तिच्या कार्याचें महत्त्व पटेल अशी अपेक्षा त्यांनीं व्यक्त केली. उद्योग–व्यापार वार्षिकाच्या तृतिय खंडाचें प्रकाशन केल्यावर त्यांनीं अशा माहितीपूर्ण व उपयुक्त ग्रंथांचा वाढता प्रसार होणें आवश्यक असल्याचें मत व्यक्त केलें.

---

**ओरिसांतील लोखंडाच्या खाणी**—ओरिसा चेंबर ऑफ कॉमर्सचे चिटणीस श्री. एस्. सी. बोस ह्यांनीं पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत असें सांगितलें कीं, ओरिसामधील लोखंडाच्या मातीच्या खाणींपासून रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याखेरीज आणखी चार कारखान्यांना पुरवठा होऊं शकेल. ओरिसाच्या लोखंडाच्या खाणींच्या विपुलतेची कल्पना नियोजकांना नाहीं, असेंहि ते म्हणाले.

### शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी : व्याजाच्या दरानुसार % प्रमाण

( ३१–१२–१९५४ )

| व्याजाचा दर | हिंदी शेड्यूल्ड बँका | एक्सचेंज बँका | सर्व शेड्यूल्ड बँका |
|---|---|---|---|
| ०% | २८.०८ | २७.४४ | २७.९६ |
| त्यापुढें ¼% पर्यंत | १३.१९ | २४.१० | १५.२६ |
| त्यापुढें ½% पर्यंत | १.७७ | ०.०९ | १.४५ |
| त्यापुढें १% पर्यंत | १०.७० | १.१९ | ८.९० |
| त्यापुढें १½% पर्यंत | ८.८४ | ७.८२ | ८.६५ |
| त्यापुढें २% पर्यंत | ३.५७ | १४.३८ | ५.६२ |
| त्यापुढें २½% पर्यंत | ५.६६ | ५.१७ | ५.५७ |
| त्यापुढें ३% पर्यंत | १८.१९ | १८.३९ | १८.२३ |
| त्यापुढें ४% पर्यंत | ८.३१ | ०.८८ | ६.९० |
| त्यापुढें ५% पर्यंत | १.६३ | ०.५३ | १.४२ |
| ५% पुढें | ०.०५ | — | ०.०४ |
| | १००.०० | १००.०० | १००.०० |

### बिगर शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी : व्याजाच्या दरानुसार % प्रमाण

( ३१–१२–५४ )

| व्याजाचा दर | एकूण ठेवींशीं प्रमाण |
|---|---|
| ०% | ९.५२ |
| त्यापुढें ½% पर्यंत | २.६९ |
| त्यापुढें १½% पर्यंत | ८.९२ |
| त्यापुढें २% पर्यंत | १५.९१ |
| त्यापुढें ३% पर्यंत | २२.७३ |
| त्यापुढें ४% पर्यंत | १७.४५ |
| त्यापुढें ५% पर्यंत | १६.४० |
| ५% पुढें | ६.३९ |
| | १००.०० |

### दि. पेण को. अर्बन बँक लि., पेण

अध्यक्ष : नारायण यशवंत नेने.

मॅ. डायरेक्टर : रामकृष्ण गोविंद भावे, बी. एजी.

| अ. नं. | खात्याचें नांव | ३०–६–५३ अखेर | ३०–६–५४ अखेर | ३०–६–५५ अखेर |
|---|---|---|---|---|
| १ | सभासद संख्या | ३६२ | ३५१ | ३५१ |
| २ | शेअर भांडवल | ३१,२७५ | ३२,४५० | ३४,६७५ |
| ३ | रिझर्व्ह फंड | १५,९४८ | १७,२६४ | २८,२३३ |
| ४ | इतर फंड | २२,६२६ | २३,४२८ | ११,३९७ |
| ५ | ठेवी | १,१७,२६८ | १,४५,६२९ | १,६२,८३० |
| ६ | इन्व्हेस्टमेंटस् | ६३,७७१ | १,००,४९६ | १,३१,१७५ |
| ७ | कर्ज कॅशक्रेडिट भाताचे तारणावर कर्ज | १,०७,३४८ | १,०३,९९९ | १,३४,७२३ |
| ८ | थकबाकी | ३६,७५५ | २८,७११ | २३,०४१ |
| ९ | नफा | ३,३२९ | ३,५५५ | ४,६९६ |
| १० | डिव्हिडंड | ६% | ६% | या वर्षी ६% सुचविलेलें |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.